# जिल्हा परिषद जळगाव

**(सामान्य प्रशासन विभाग)**

Contact No.-(off.) 0257-2224255 **Email-dyceogenjalgaon@gmail.com**


जा.क्र.साप्रवि/आस्था-६/आरआर/५१३/२०२४ दिनांक :- १८/०७/२०२४

प्रति,

**१)औषध निर्माण अधिकारी २) कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)**
**३) कनिष्ठ अभियंता ४) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक**
**या संवर्गातील अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवार**
**(प्रतिक्षा यादीतील वगळुन)**

**विषयः- जिल्हा परिषद, जळगांव अंतर्गत गट - क संवर्गातील सरळसेवा पदभरती समुपदेशनास उपस्थित राहणे बाबत - दिनांक २२/०७/२०२४**

**संदर्भ :-** १.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रानिमं/१२२२/प्र.क्र. ५४/का-२१३-अ दिनांक ४ मे २०२२ व आपलेकडील Vacancy Matrix
२.जळगाव विविध संवर्गाची पद भरती जाहिरात क्र. ०१/२०२३
३.जिल्हा निवड समिती वेळोवळी इतिवृत्त

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जिल्हा परिषद जळगांव अंतर्गत विविध विभागाकडील रिक्त असलेली पदे सरळसेवेने पद भरती करणेसाठी देण्यात आलेली जाहिरात, ऑनलाईन परिक्षा,आय.बी.पी.एस.कंपनीकडून प्राप्त निकाल गुणपत्रक व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक/प्रानिभ-१२२२/प्र.क्र.५४/का-१३-अ दिनांक ४ मे २०२२ मधील तरतुदीनुसार अंतिम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणेत आली. त्यानुसार **कनिष्ठ सहाय्यक, औषध निर्माण अधिकारी, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक,** या संवर्गातील पात्र उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी करणेत येऊन अंतिम निवड व प्रतिक्षा यादी जिल्हा निवड समितीकडून अंतिम करणेत येऊन सदर यादी जिल्हा परिषदेच्या **www.zpjalgaon.gov.in** संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्याअन्वये खालील नमुद केलेल्या संवर्गातील अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवार (प्रतिक्षा यादीतील वगळुन) यांना नियुक्ती देणे असल्याने खालील तक्त्यात संवर्गनिहाय नमुद केल्याप्रमाणे **दिनांक २२/०७/२०२४ रोजी छत्रपती शाहु महाराज सभागृह, जिल्हा परिषद, जळगांव** येथे समुपदेशन घेण्यात येणार असुन सर्व निवड झालेल्या पात्र उमेदवारांनी न चुकता हजर रहावे. सदर **समुपदेशनासाठी गैरहजर राहिल्यास उमेदवार यांना गुणवत्तेनुसार व रिक्त पदांच्या स्थितीनुसार** संबधितांची नियुक्ती करणेत येईल.

| अ.न | दिनांक | संवर्ग | समपुदेशनाची वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २२/०७/२०२४ | औषध निर्माण अधिकारी | सकाळी ११.०० वा. | **छत्रपती शाहु महाराज सभागृह, जिल्हा परिषद, जळगांव** |
| २ | | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | दुपारी ११.३० वा. | |
| ३ | | कनिष्ठ अभियंता | दुपारी १२.०० वा. | |
| ४ | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | दुपारी १२.३० वा. | |

(स्नेहा पवार)
**सदस्य सचिव,**
**जिल्हा निवड समिती तथा,**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)**
**जिल्हा परिषद,जळगांव**

**प्रत :-** सर्व संबधित खाते प्रमुख ---------------- जि.प.जळगांव यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना